# जिल्हा परिषद, कोल्हापूर
## कार्यकारी अभियंता
## ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,

नविन प्रशासकिय इमारत, पहिला मजला दालन क्र.१२१,नागाळा पार्क, कोल्हापूर४१६००३
फोन नं.०२३१-२६५११६० E-mail - eebokolhapur@gmail.com


जा.क्र.कोजिप/ग्रापापु/कावि- ८ / ९३६४/२०२१ दि. ८/१२/२०२१

प्रति,
मा. उपवन संरक्षक
कोल्हापूर वनविभाग,कोल्हापूर

विषय:- <u>वन(संवर्धन) अधिनियम १९८० अंतर्गतचा प्रस्ताव</u>
मौ. बादेवाडी ता. पन्हाळा येथील पिण्याच्या पाण्याचा ०.०४५२ हेक्टर आर क्षेत्राचा प्रस्ताव सादर करीत असलेबाबत.

संदर्भ :- मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि केंद्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य नागपूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/कोल्हापूर/ D-१२८८३(२८)/ ७३५/ दि. १०/८/२०२१.

उपरोक्त विषयास अनुसरून मौ. बादेवाडी ता. पन्हाळा येथील पिण्याच्या पाण्याचा ०.०४५२ हेक्टर आर क्षेत्राच्या प्रस्तावावरील त्रुटी पूर्तता अहवाल मा. मुख्य वनसंरक्षक (प्रा) कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-६/नोसेल/२१-२२/ ३३१ दि. ५/७/२०२१ अन्वये मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि केंद्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य नागपूर यांचे कार्यालयास सादर करणेत आली होता. त्यावर वरील संदर्भिय पत्रान्वये मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक आणि केंद्रस्थ अधिकारी महाराष्ट्र राज्य नागपूर कार्यालयाकडून ३ मुद्यांवर माहिती मागविण्यात आलेली आहे. ती खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

(२.१) मौ. बादेवाडी हे गाव पन्हाळा तालुक्यातील डोंगरी भागात आहे. या गावाच्या जवळपास नदी,झरे,मोठे तळे नाहीत.त्यामुळे प्रत्येक वर्षी गावातील लोकांच्या पिण्याच्या पाण्याची टंचाई माहे फेब्रुवारी ते जून अखेर नियमित प्रत्येक वर्षी असते त्यामुळे बादेवाडी वनगट क्रमांक १८७ मध्ये नाल्यावर छोटा बांध घालून पाणी चेंबर मध्ये अडवून त्यातून पाण्याची पाईपलाईन प्रस्तावित केलेली असून तसे प्रस्तावातील स्थळदर्शक नकाशात दर्शविण्यात आलेले आहे. त्यासाठी एकूण ०.०४५२ हे. आर वन क्षेत्राचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

(२.२) प्रस्तावित पिण्याची पाण्याची पाईपलाईन बादेवाडी गावातील वन गट क्रमांक १८७,१८५ व कंपार्टमेंट क्रमांक ८३५ मधून जात आहे. तसेच सदरची पाण्याची पाईपलाईन बादेवाडी गावातील खजगी क्षेत्रातून जात आहे. सदरची गट नं. कंपार्टमेंट नंबर निहाय पाईपलाईन वेगवेगळया रंगाने दर्शवून त्याची KML फाईल सीडीमध्ये तयार करून यासोबत ४ प्रतीत सादर करण्यात येत आहे. सदरची पाईपलाईन करताना त्यामध्ये कोणतीही राहती घरे आडवी येत नाहीत. गावाच्या बरच भागात वनक्षेत्र असल्यामुळे व तिथे पाण्याचा स्त्रोत चांगला असल्यामुळे प्रस्तावित केलेल्या पाईपलाईनशिवाय इतर कोणताही पर्याय उपलब्ध नाही. या पिण्याच्या पाण्यासाठी फक्त ०.०४५२ हे. आर इतके कमी वनक्षेत्र लागत आहे. त्यामुळे प्रस्तावित पाईपलाईन योग्य आहे.

(२.३) प्रस्तावित पिण्यांच्या पाण्याचे पाईपलाईनचे प्रस्तावित क्षेत्र ०.०४५२ हे. आर असलेने कोल्हापूर वनविभागामार्फत मौ. बादेवाडी येथीलच वन गट क्र. १८५ मध्ये १ हेक्टर पडीक वन क्षेत्रावर वनीकरण करण्याचे प्रस्तावित केले आहे. त्याची गट क्र. निहाय,कंपार्टमेंट नंबर निहाय KML फाईल साडीमध्ये तयार करून

८/१२/२१
आवक / जावक लिपीक
उप वनसंरक्षक, कोल्हापूर वन विभाग, कोल्हापूर.

Kulkarni madam D:\Kale\Panhala\Panhala

यासोबत ४ प्रतीत सादर करण्यात येत आहे. तसेच वनीकरण क्षेत्र परिवेश पोर्टलवर आलोड केलेली आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

वरीलप्रमाणे उपस्थित मुद्यांची पुर्तता करण्यात येत आहे. सदरचा प्रस्ताव हा लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा असलेने कृपया लोकहितास्तव यास मंजूरी मिळावी हि विनंती.

सोबत -वरीलप्रमाणे KML फाईल सीडी.

(अशोक धोंगे)
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद कोल्हापूर.

प्रत :- उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग पन्हाळा यांना माहितीसाठी.

Kulkarni madam D:\Kale\Panhala\Panhala

जिल्हा परिषद, कोल्हापूर
कार्यकारी अभियंता
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
नविन प्रशासकिय इमारत, पहिला मजला दालन क्र.१२१,ना·
कोल्हापूर४१६००३
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
फोन नं.०२३१-२६५११९६०
E-mail - eebnkolhapur@gmail.com

Date-24-12-2021

# CERTIFICATE

The pipe line of water supply scheme of Badewadi village Passes through forest land and private land of Badewadi (Tal-Panhala Dist- Kolhapur). In the google map of KML it seems that pipe line passes through household. But actually pipe line donot passes through household which are at road side.

(Ashok Dhonge)
Exicutive Engineer
Rural Water Supply Division
Zillha Parishad Kolhapur